# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.महिला व बालकल्याण समिति
## कार्यपत्रिका क्रमांक - १०
## सभावृत्तांत

दिनांक- १५/४/२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक १५/४/२०१० रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

मा.सभापती - सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने सोमवार दिनांक २६/४/२०१० रोजी दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(लोखंडे सुजाता सुनिल)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १०
सभावृत्तांत
( दि.१५.४.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- २६/४/२०१० वेळ - दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दि.१५.४.२०१० ची तहकुब सभा सोमवार दिनांक २६/४/२०१० रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
३. मा.फुगे सुनंदाताई विजय

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.
-----------

मा.सभापती :- सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने बुधवार दिनांक १२/५/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(लोखंडे सुजाता सुनिल)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.महिला व बालकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १०
## सभावृत्तांत
( दि.१५.४.२०१० व २६.४.२०१० ची तहकुब सभा)

दिनांक- १२/५/२०१० वेळ - दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दि.२६.४.२०१० ची तहकुब सभा बुधवार दिनांक १२/५/२०१० रोजी दुपारी १.४५ वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव,मा.जगताप - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

दिनांक १०/३/२०१० व २९/३/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक- ३१ विषय क्रमांक- १
दिनांक- १२/५/२०१० विभाग - नागरवस्ती विकास
सूचक- मा.सुषमा गावडे अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/ २/कावि/१६७७/२००९ दि.२२.१०.०९
विषय- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थे मार्फत प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- ३२ विषय क्रमांक- २
दिनांक- १२/५/२०१० विभाग - नागरवस्ती विकास
सूचक- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/ ८/कावि/४५/२०१० दि.२५.०३.०१०

मा.अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.१६ इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकिय (M.B.B.S),अभियांत्रिकी संगणक प्रथम वर्ष पदवी परीक्षा यासारखे उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावासोबतचे प्रपत्र अ प्रमाणे ०६ लाभार्थींना प्रत्येकी र.रू.७५००/- प्रमाणे एकत्रित र.रु. ४५,०००/- अदा करणेस तसेच या योजनेसाठी प्राप्त अर्जांमध्ये जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र आहेत त्यांनी पूर्तता केल्यास त्यांनासुध्दा योजनेच्या नियमानुसार अर्थसहाय्याचा लाभ देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- ३३ विषय क्रमांक- ३
दिनांक- १२/५/२०१० विभाग - नागरवस्ती विकास
सूचक- मा.सुषमा गावडे अनुमोदक- मा.ज्योती भारती
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/ ८/कावि/४४/२०१० दि.२५.०३.२०१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील यो.क्र.०३ मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे या योजने अंतर्गत अर्चना बाळासाहेब धायगुडे यांना र.रु.२,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- ३४ विषय क्रमांक - ४
दिनांक- १२/५/२०१० विभाग - नागरवस्ती विकास
सूचक- मा.अलकाताई यादव अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.अति.आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/ ८/कावि/५१/२०१० दि.२५.०३.२०१०

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील मुलींना यो.क्र.१० खाजगी क्लासची फी देणेकामी अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे २३ लाभार्थींना प्रत्येकी र.रु.१,०००/- प्रमाणे एकत्रित र.रु.२३,०००/- अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ५
दिनांक- १२/५/२०१० विभाग - नागरवस्ती विकास
सूचक- मा.ज्योती भारती अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/ ८/कावि/५५/२०१० दि.३०.०३.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २००८ - ०९ या आर्थिक वर्षात यो.क्र.१५ पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील परदेशी उच्च शिक्षण /प्रशिक्षण घेण्या-या युवतींना अर्थसहाय्य देणे या योजनेअंतर्गत ऐश्वर्या अशोक कोटस्थाने व रिमा विजय देवधर यांनी MBA या अभ्यासक्रमासाठी लंडन स्कुल ऑफ मार्केटिंग, लंडन या ठिकाणी प्रवेश घेतला असल्याने योजनेच्या अटी व शर्तीनुसार दोन्ही अर्ज पात्र झाले असल्याने त्यांना प्रत्येकी र.रु.१,००,०००/- याप्रमाणे विद्यापीठाचे नावे अदा करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. २,००,०००/- चे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(लोखंडे सुजाता सुनिल)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/ ६१५ /२०१०
दिनांक - १३ / ५ /२०१०

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.